सत्यमेव जयते
महाराष्ट्र वनविभाग

# संचालक, बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली यांचे कार्यालय

मु.पो.चिचपल्ली मुल रोड ता.जि.चंद्रपूर, 441224 (महाराष्ट्र)
दूरध्वनी क्र.- 07172 272999 E-mail :- brtcchichpalli@gmail.com

**नोटीस बोर्ड/संकेतस्थळ**
**जावक क्र. कक्ष-5/प्रशिक्षण/2026-27/ 159** **दिनांक:- 12/05/2026**

## सूचना

विषय :- भोजनव्यवस्थेचा पुरवठा करणाऱ्या कॅटरर्स/बचतगट/व्यक्तीकडून दरपत्रक मागविणेबाबत.

ooo

उपरोक्त विषयांचे अनुषंगाने सूचित करण्यात येते की, बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली अंतर्गत बांबू पदविका अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांकरिता पुढील 6 महिने कालावधीकरिता चांगल्या दर्जाच्या भोजन, चहा, नास्त्याची आवश्यकता असल्याने खालील निकषानुसार चांगल्या दर्जाच्या भोजन पुरवठा करण्याकरिता सदर सेवा देणाऱ्या (कॅटरर्स/बचतगट/व्यक्तीकडून) विविध पुरवठाधारकाकडून दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशील | दर |
|---|---|---|
| 1 | जेवण – 2 वेळ<br>पोळी, भात, वरण, भाजी -2 (एक हंगामी भाजी)<br>टीप – आठवड्यातून एकदा नॉनवेज/गोड पदार्थ अपेक्षित राहील. (व्हेजीटेरीयन साठी पनीर भाजी आवश्यक राहील.) | प्रति विद्यार्थी (प्रति दिवस) |
| 2 | नास्ता- 1 वेळ<br>(चनापोहो, उपमा, उसळ, इडली, सांबार वडा, बटाटावडा, अंडी-केळी अपेक्षित राहील.) | |
| 3 | चहा-बिस्कीट 1 वेळा | |

त्या अनुषंगाने इच्छुक पुरवठाधारकांनी आपले दरपत्रक खालील अटी व शर्तीचे अधीन राहून ही सूचना प्रसारित झाल्यापासून दि.13/05/2026 ते 28/05/2026 पर्यंत (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) **संचालक, बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली** यांचे नावे बंद लिफाफ्यात या कार्यालयात प्रत्यक्ष किंवा पोस्टाद्वारे जमा करावे.

**(एम.एन.खैरनार, भा.व.से.)**
**संचालक,**
**बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र**
**चिचपल्ली**

**<u>दरपत्रक सादर करण्याचा पत्ता :-</u>**
संचालक, बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली संकुल,
हनुमान मंदिर जवळ, चंद्रपूर – मुल रोड, चिचपल्ली, ता.जि.चंद्रपूर.
पिन कोड क्र. 441224

Scanned with OKEN Scanner

**<u>अटी व शर्ती :-</u>**

1) पुरवठाधारक हा अधिकृत वैध GST/PAN नोंदणीकृत असावा.
2) पुरवठाधारकाकडे अन्न आणि औषध प्रशासन विभागाचा वैध परवाना असणे बंधनकारक राहील.
3) पुरवठाधारकास शासकीय संस्थाना भोजन पुरवठा करण्याचा किमान 3 वर्षाचा अनुभव असावा त्याबाबत त्यांनी आवश्यक वैध प्रमाणपत्र सोबत जोडावे.
4) स्थानिक बचतगटास प्राधान्य देण्यात येईल.
5) दररोज ताजे व स्वच्छ अन्न बंधनकारक असून गुणवत्ता, पौष्टिकता व स्वच्छता कायम ठेवणे हे पुरवठाधारकाची जबाबदारी राहील त्याबाबतचे स्वयंघोषणापत्र सोबत जोडावे.
6) जेवण तयार करण्यासाठी लागणारे आवश्यक इंधन, पाणी, वीज व स्वच्छतेकरिता लागणारे मनुष्यबळ याची जबाबदारी पुरवठाधारकाची राहील याबाबतचे स्वयंघोषणापत्र सोबत जोडावे.
7) दरपत्रकासोबत मेनू यादी जोडणे पुरवठाधारकास बंधनकारक राहील. ही मेनू यादी जोडताना त्यामध्ये साप्ताहिक जेवणाचा व नाश्त्याचा सविस्तर तपशील जोडणे बंधनकारक राहील व ही मेनू यादी निवीदा उघडण्याच्या दिवशी या विभागाने गठीत केलेल्या समितीने मंजूर करणे बंधनकारक राहील.
8) दरपत्रक हे संचालक बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली यांचे नावे सीलबंद लिफाफ्यात सादर करावे व त्यावर पुरवठाधारकाचे नाव व मोबाईल क्रमांक हे स्पष्ट नमूद करावे.
9) निविदा उघडण्याचा दिनांक पुरवठा धारकास वेगळ्याने या कार्यालयातर्फे कळविण्यात येईल. त्याची सविस्तर सूचना वेगळ्याने या विभागाच्या नोटीस फलकांवर व संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.
10) निविदा व जाहिरातीचा सर्व अधिकार संचालक, BRTC यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहे.

प्रतिलिपी :- 1) कार्यालय नोटीसबोर्ड/BRTC संकेतस्थळ/ ग्रामपंचायत चिचपल्ली नोटीसबोर्ड
2) वनपरिक्षेत्र अधिकारी, BRTC यांना वरीलप्रमाणे माहितीस अग्रेषित.
3) वनरक्षक, BRTC चिचपल्ली यांना वरीलप्रमाणे माहितीस अग्रेषित. त्यांनी सदर जाहिरातीस जास्तीत जास्त प्रसिद्धी देण्याकरिता BRTC संकुल चिचपल्ली, BRTC कार्यशाळा संकुल वनअकादमी चंद्रपूर तसेच ग्रामपंचायत चिचपल्ली येथील सूचनाफलकावर जाहिरात लावावी तसेच जाहिरातीत नमूद केलेल्या कालावधीत पुरवठाधारकाकडून प्राप्त झालेल्या गोपनीय लिफाफ्याची नोंद रजिस्टर मध्ये घेऊन लिफाफे वनपरिक्षेत्र अधिकारी यांचे कक्षामध्ये जमा करावे.

**(एम.एन.खैरनार, भा.व.से.)**
**संचालक,**
**बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र**
**चिचपल्ली**

Scanned with OKEN Scanner